उल्हासनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २१ /२०२५ दि. १०/०२/२०२५

**—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—**

**ज्याअर्थी,** उल्हासनगर शहरातील ममता हॉस्पीटल बस स्टॅड, उल्हासनगर –१ या ठिकाणी मोठया प्रमाणात अपघात व हार्ट अटॅक चे अति तात्काळ पेशंट घेवुन नागरीक उपचारासाठी ॲम्ब्युलन्स अथवा खाजगी वाहनाने घेवुन येत असतात. त्यामुळे सदर परिसरात वाहनांची गर्दी होवू नये, वाहतुकीस अडथळा होवून वाहतुक कोंडी होवू नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट,** पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद :–** छत्रपती शिवाजी महाराज चौक प्रवेशव्दार सहयाद्री कॉलनी या ठिकाणी ममता हॉस्पीटल ते बस स्टॅन्ड, उल्हासनगर –१ दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **छत्रपती शिवाजी महाराज चौक प्रवेशव्दार सहयाद्री कॉलनी येथे प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने उजवी कडे वळुन चरणदास चौक पुढे उजवीकडे वळुन उल्हासनगर वाहतूक उप विभाग समोरुन इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्या तारखेपासुन ३० दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सुचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा कार्यालय, तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची अधिसुचना पुढील आदेश होई पावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक विभाग, ठाणे शहर.

प्रति,
जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर
– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
– मा. जिल्हाधिकारी, ठाणे

CamScanner

- मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालीका.
- मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
- पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर
- पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
- विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, विठठलवाडी
- नियंत्रण कक्ष, ठाणे/उल्हासनगर
- ठाणे पोलीस पत्रक

प्रत – पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– स.पो.आ. उल्हासनगर वाहतूक विभाग/पोनि उल्हासनगर वाहतूक उपविभाग.
२/– उल्हासनगर महानगरपालिकेच्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner